अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# काँग्रेसला सत्तेचा अमरपट्टा हवा

लोकशाहीमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याला खूप महत्त्व आहे. विचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य आणि मतस्वातंत्र्य ही लोकशाहीची जशी पायाभूत तत्त्वे ठरतात. याचा एक मोठा आविष्कार म्हणूनच निवडणूक प्रक्रियेकडे पाहिले जाते. निवडणुकांमधले मतदान गुप्त स्वरुपाचे जरी असले तरीसुध्दा लोकांचा कल कोणत्या बाजूने आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीविषयी त्यांचे काय मत आहे. त्यांना सत्ताधारी पक्षाविषयी किंवा विरोधी पक्षाविषयी काय वाटते. हे जाणून घेणे याच अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग ठरते. किंबहुना मतदानापूर्वी त्याच्या विचार स्वातंत्र्याला गती देण्याचे काम झाले, तर ते निकोप लोकशाहीच्या दृष्टीने उपयुक्तच मानायला हवे. गेल्या काही वर्षांपासून भारतामध्ये निवडणूकपूर्व सर्वेक्षण केले जाते. निवडणूक मतचाचणी होते. त्यामधून येणाऱ्या निवडणुकीत कोणत्या राजकीय पक्षाची काय स्थिती आहे याचा अंदाज घेता येतो. एका विशिष्ट कार्यपध्दतीवर आधारित असलेली ही मतचाचणी लोकांमध्ये निश्चितच जागृती करणारी असते. आतापर्यंतच्या मतचाचण्यांमधून त्यातला ८० ते ९० टक्के भाग खरा ठरलेला आहे. या मतचाचण्या काही राजकीय पक्षांना फायद्याच्या ठरतात. तर ज्यांच्या विरोधात जनमत आहे त्यांच्यासाठी नुकसानीच्या ठरतात. येत्या महिनाभरात होणाऱ्या पाच विधानसभा आणि आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये कोणता राजकीय पक्ष कोणत्या स्थानावर असेल याचे अंदाज व्यक्त झाले आहेत. त्यामध्ये काँग्रेसची परिस्थिती खूप हलाखीची आहे. ती आणखी बिघडू नये म्हणून काँग्रेस बिथरलेली दिसते आणि या पक्षाने अशा प्रकारच्या मतचाचण्यांवर किंवा ओपिनियन पोल वर बंदी घालण्याची मागणी करून आपले हसे करून घेतले. प्रत्यक्ष लढाईपूर्वी पराभव मान्य करण्याची दुर्बुध्दी काँग्रेसला सुचलेली दिसते. स्वत:चे नुकसान टाळण्याकरता लोकशाहीतल्या विचार स्वातंत्र्याला मूठमाती देत आहोत याचे भान काँग्रेसच्या नेत्यांना राहिलेले दिसत नाही. मतचाचण्यांवर बंदी जरी घातली तरी जनतेचा जो कल आहे त्यात कोणताही मोठा फरक पडणार नाही. स्वत:च्या समाधानासाठी हा उद्योग करायचा असेल तर काँग्रेसने तो खुशाल करावा. पण त्याचा उपयोग होण्याची शक्यता नाही.

## जनता हीच मोठी शक्ती

यापूर्वीसुध्दा अशा प्रकारे ज्या–ज्या वेळेला काँग्रेसविरोधी वातावरण झाले. त्या–त्या वेळी काँग्रेसने अशा प्रकारच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा प्रयत्न केला. त्या–त्या वेळी तो काँग्रेसला महागात पडला. अण्णा हजारेंच्या आंदोलनाच्यावेळी देशभर एक काँग्रेसविरोधातली जबरदस्त लाट निर्माण झाली होती. विशेषत: तरुण वर्गाने सोशल मीडीयाचा वापर करून एक मोठे जनमत उभे केले आणि देशातील 'न भूतो न भविष्यती' असे जनआंदोलन उभे राहिले. ट्विटर, फेसबुक आणि ब्लॉगवरून अक्षरश: लाखो तरुणांनी आपापली मते व्यक्त केली. भ्रष्टाचारविरोधातला आपला जबरदस्त असंतोषही व्यक्त केला होता. त्यानंतर झालेल्या रामदेव बाबांच्या आंदोलनाच्या वेळी हाच अनुभव आला. सोशल नेटवर्कींगचा एक मोठा प्रभाव निर्माण होऊ शकतो. त्याचा काँग्रेसला फटका बसतो आणि म्हणून या सोशल नेटवर्कींगवरही सेन्सॉरशिप आणण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या काही नेत्यांनी करून बघितला. त्यावेळी त्यांच्याविरुध्ददेखील लोकांनी नाराजी व्यक्त केली होती. आणीबाणीचे उदाहरण तर सगळ्या जगाच्या समोर आहे. इंदिरा गांधींच्याविरोधात देशभर लाट निर्माण झाली. जयप्रकाश नारायण यांनी सुरू केलेल्या संपूर्ण क्रांतीच्या आंदोलनाला पाठिंबा मिळू लागला आणि आपली सत्ता आता जाणार या भीतीने ग्रस्त झालेल्या इंदिरा गांधींनी वृत्तपत्र स्वातंत्र्य आणि सगळ्याच प्रकारच्या स्वातंत्र्यावर बंदी घातली. आणीबाणी जाहीर करून लोकशाहीच्या मूळ तत्त्वालाच नख लावले गेले होते. त्यावेळीदेखील काँग्रेसला मोठे नुकसान पत्करावे लागले. हा सगळा अनुभव माहीत असताना आता मतचाचण्यांवर बंदी घालण्याची भाषा या पक्षाने वापरावी म्हणजे पुन्हा 'विनाशकाले विपरित बुध्दी' असेच म्हणणे भाग पडते.

## लोकशाहीच्या तत्त्वाला नख लावू नका

ज्या–ज्यावेळी काँग्रेसच्या विरोधात वातावरण निर्माण होते, त्या–त्यावेळी ते कोणत्या ना कोणत्या मार्गाने दडपण्याचा प्रयत्न काँग्रेस करत राहते. रामदेव बाबांच्या रामलीला मैदानाच्या आंदोलनाच्या वेळी थेट पोलीस बळाचा वापर करून आपला विरोध चिरडून काढण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला. परंतु त्याचा परिणाम उलट झाला आणि लोकांमध्ये खदखदत असलेल्या काँग्रेसविरोधात त्याची भर पडली. निवडणुकांमध्ये कोणाचा तरी विजय होणार आणि कोणाला तरी पराजय पत्करावा लागणार आणि ही प्रक्रिया जितक्या मुक्तपणे पार पाडली जाईल. तिलाच तर लोकशाही म्हटले जाते. लोकशाही व्यवस्था अधिकाधिक भक्कम आणि परिपक्व करायची असेल तर विरोधातल्या मताला तितकाच मान दिला पाहिजे. कोणताही राजकीय पक्ष किंवा नेता सत्तेचा अमरपट्टा घेऊन आलेला नाही. जनता हीच लोकशाही व्यवस्थेची सर्वात मोठी शक्ती आहे. तिच्या मताचाच आदर झाला पाहिजे. मतचाचण्यांवर बंदी लादून लोकांचा आवाज दाबता येणार नाही. आधीच आपल्याविरोधात असलेल्या वातावरणात आणखी नवी भर घालण्याचे काम काँग्रेस करत आहे. त्यातून ना पक्षाचे भले होईल ना लोकशाहीचे कल्याण होईल. जेवढी व्यापक भूमिका राजकीय पक्ष स्वीकारतील आणि लोकमताचा आदर करतील तेवढे त्यांचे राजकीय भवितव्य उज्वल होत जाईल.